भगवते वासुदेवाय " ह्या मंत्राचा जप करणारांना मात्र ती चुकते हें भक्ति-महात्म्य किती अगाध आहे ?

## सूत्र १४. लोकोपि तावदेव किंतु भोजनादिव्यापारस्त्वाशरीरधारणावधि॥

आर्या. लोकापवाद बाधे, तों कर्मे लौकिके न टाकावीं ॥
ही तनु साईचें गृह, ऐशा भावे तियेसि रक्षावे ॥

विवरणः--एकादश सूत्रोक्त सर्वकर्मसंन्याससंबंधीं द्वादश आणि त्रयोदश सूत्रात शास्त्रोक्त कर्मांपुरती थोडीशी ढिलाई करून, आतां ह्या सूत्रात लौकिक-कर्मांसंबधीं होत असलेला ढिलाईविषयीं विचार सांगितला आहे. " ब्रह्मयाहून मोठा झाला । जरी ब्रह्मांड भेदून गेला ॥ सर्व लोकीं बरवा झाला ॥ हें तों कदापि घडेना ॥ १ ॥ कोणी करिती वल्गना ॥ लोक धरितां धरवेना ॥ लोकाचा तो राखवेना ॥ काहीं केल्या संतोष ॥ २ ॥ प्रेमे केले पोषण ॥ तरी ठेविती दूषण ॥ सर्व लोकांस भूषण ॥ होणार नाहीं ॥ ३ ॥ बरवें म्हणावया साठीं ॥ व्यर्थ करितो आटाआटी ॥ उगीच कामना लागली पाठी ॥ तेणें झाला वरपडा ॥ ४ ॥ ह्याप्रमाणे जनस्थितीचा अनुभव घेऊन " लोक जैसा ओक धरिता धरवेना ॥ अशी भावना होण्याच्यापूर्वी शास्त्रविरुद्ध असलेल्या लौकिककर्मांचाहि त्याग सिद्ध पुरुष करीत नाहींत, आणि शरीरनिर्वाहास अवश्य असलेल्या भोजनादि कर्मांचा आमरण त्याग करीत नाहींत; इतका ह्या सूत्राचा अर्थ आहे. वास्तविक पाहता " इसापनीति " ह्या पुस्तकातील " म्हातारा मनुष्य आणि त्याचा बैल " ह्या गोष्टींत सांगितल्याप्रमाणे जन त्रिविध आहे, असे पक्के उमजून " कोणी निंदा कोणी वंदा । आम्हां स्वहिताचा धंदा " अशा निश्चयाने जनवादाची मुळींच पर्वा न करितां सदासर्वदा " मनः पूतं समाचरेत् " असें वागणेंच योग्य आहे; परंतु हा मार्ग फार कठीण आहे त्याला मनोनिग्रह लागतो. " फ्राम् लॉग् केबिन् टु व्हाइट् हाउस् " ह्या नांवाच्या अमेरिकेचे प्रेसिडेंट् गार्फील्ड ह्यांच्या चरित्रात त्यांनीं

ह्याच मार्गाचा अनपवादक अवलंब केला होता, असे म्हटलें आहे. धन्य आहे त्या पुरुषाची व्यवहारात राहून असे वागणें लाखों मनुष्यांमध्यें एकाद्याला साधणार. बाकीचे सारे एषणांचे गुलाम होत. " अमानित्वं " हे आद्य ज्ञान-लक्षण आहे ( भ. गी. १३-७ ) असे जे भगवान् श्रीकृष्णानीं म्हटलें आहे, त्याचें कारणहि लोकैषणेचे निंद्यत्वच आहे; आणि ती निंद्य कां आहे ते प्रथम सूत्राच्या विवरणांत दिलेल्या श्रीरामचंद्रोक्तीवरून सहज कळून येते. शिवाय ह्या लोकैषणेसाठीं हरघडीस

" सर्वभूतस्थित यो मां भजत्येकत्वमास्थितः । " ( भ. गी. ६-३१)

( अर्थ—श्लोकार्ध )

जो मातें सर्वभूतस्था । भजे अद्वैतबुद्धिनें ॥

ह्या भगदुक्तीतील स्वहृदयस्थ अद्वितीय परमात्म्याचीच प्रथमतः अवज्ञा करावी लागते, आणि तिच्यामुळें सहजच सर्वभूतस्थित परमात्म्याचीहि अवज्ञा होते. म्हणजे अर्थात् तिच्यामुळें परमात्म्याची ओळखच नाहींशी होते; आणि तेणें-करून " न हि सत्यात्परो धर्मः " ह्या उक्तींतील श्रेष्ठ-धर्म-रूपी सत्याला आंचवण्याची पाळी येते. साराश, लोकप्रशंसेच्या नादीं लागणे, हा एक नास्तिक्याचाच प्रकार होय; आणि ज्यानीं ती तदर्थ केलेल्या स्वप्रयत्नाने सफल करून घेतली ते नास्तिकशिरोमणि होत, असे म्हणणे भाग आहे. परंतु सिद्ध पुरुषांचा प्रकार ह्याहून भिन्न असतो. ते उदासीन असतात; म्हणजे ते लोकैषणेनें कोणत्याहि लौकिक कार्यास प्रवृत्त होत नाहींत, अथवा आपल्या पूर्वीच्या लौकिक आचाराचा बुद्धिपुरःसर त्यागहि करीत नाहींत. हा लोकैषणेचा विचार झाला. आतां वित्तैषणेचा विचार करूं.

केवळ सत्याला स्मरून शुद्ध स्वधर्मानें प्राप्त झालेल्या द्रव्याशिवाय एक कपर्दिकाचाहि संग्रह न करणारे स्वधर्मद्वारें प्राप्त झालेल्या द्रव्यापैकीं एक कवडीचाहि अपव्यय न करणार पुरुष ह्या जगांत किती सांपडतील ?

वैयक्तिक संपत्ति- विभाग--पद्धतींत असा एक भयंकर हानिकारक दोष आहे कीं, त्याच्यामुळें आर्थिक दृष्ट्या जितकी देशाची हानि होते, तितकी कोणत्याहि अन्य कारणानें होत नाहीं. जो तो आपल्या पैशाचा पूर्णत्वें मालक असल्यामुळें पुरुष जितका अधिक श्रीमान् असेल तितका तो देशांतील द्रव्याचा अधिक हितशत्रू बनतो, असा सर्वस्वीं परावलंबी असलेल्या आर्यावर्ताचा सांप्रत कालचा नित्यानुभव आहे. श्रीमान् व सुशिक्षित असलेल्या अल्पसंख्याक लोकांकडून सातासमुद्राच्या पलीकडे जितकें द्रव्य जातें, त्याचा एक शतांशहि केवळ स्वकष्टार्जित द्रव्यावर कसाबसा उदर-निर्वाह करणाऱ्या अशिक्षित द्रव्यहीन कोट्यावधि लोकांकडून जात नाहीं. आणि सार्वभौमता नष्ट होऊन सर्वच भिन्न मांडलीक स्वतंत्र झाल्याकारणानें परकीयांना त्यांना व्यक्तिशः अंकित करणें सहजसुलभ झाल्यामुळें आमची अशी दैना होण्यास आमचे "नराणांच नराधिपम्" (भ. गी. १०।२७) ह्या भगवदुक्तींतील "श्रेष्ठ"च अदिकारण झाले, असें म्हणणें न्यायतःच प्राप्त आहे. खरा प्रकार असा असून जो तो सांप्रत कालचा सुशिक्षित पुरुष आपल्या देशाच्या दारिद्र्याचें खापर आमच्या गरीब बिचाऱ्या पोटार्थी भिक्षेकरी वर्गाच्या निरुद्योगीपणाच्या माथीं मारण्यास नेहमीं तत्पर असतो जेथें काम करण्यास तयार असलेल्या लोकांना देखील बेकारीचें तीव्र स्वरूप भासूं लागलें आहे, तेथें उदरंभरणार्थ भिक्षेशिवाय इतर उद्योग न करणारांना नांवें कशीं ठेवावीं मोठे मासे लहान माशांवर जसा उदर--निर्वाह करितात, तसाच आमच्या प्रायः सर्व सुशिक्षित वर्गाचा प्रकार नाहीं काय? आमच्यातील सुशिक्षित वर्ग परकीयांच्या व्यापारवृद्धीचा दलाल बनला आहे, असें म्हटल्यास त्यांत काय वावगें आहे? आमची अशी सर्वतोपरी हीन--दीन स्थिति होण्यास परकीयांची अन्याय्य द्रव्य--लालसा मुख्यत्वे कारणीभूत झाली असून, जगांत असा प्रकार नेहमीच चालावयाचा, असें वाटूं लागल्यावर जगाच्या व्यवहाराचा वीट कां येऊं नये? असा वीट येणें, ह्याचेंच नांव वैराग्य; आणि तें प्राप्त झालें म्हणजे फाटलेल्या आकाशास ठिगळ लावण्याचा प्रयत्न करण्याची वेडगळ बुद्धि नष्ट होते; व ज्यानें जग निर्माण केलें त्याच्यावर तें सोपवून आपण आपला आत्मोद्धार

करून घ्यावा, असे वाटूं लागते ह्याचेंच नाव मुमुक्षा. ही वैराग्यमूलक मुमुक्षा उत्पन्न झाली म्हणजे मनुष्य जगाचा नाद सोडून ईश्वरप्रासीस्तव आपलीं प्रारब्धेतर अखिल कर्में " यज्ञस्वरूपी भगवान् परमेश्वर जनार्दन वासुदेव प्रीयता न मम " अशा अनहंकारमूलक ईश्वरपर बुद्धीनें ( भ गी. ३. ९ ) करूं लागतो. अशा अभ्यासाच्या बळानें बुद्धि केवळ ईश्वरपर ( भ. गी (२--४१) बनली म्हणजे कर्मातीततारूप सिद्धावस्था प्राप्त होते; आणि ती प्राप्त झाल्यावरहि पूर्वाभ्याससंस्कार फलभूत कर्में कांहीं काळपर्यंत सुटत नाहींत, व सिद्धावस्थेच्या नैसर्गित ताटस्थ्यामुळें तीं बुद्धिपुर:सर सोडवतहि नाहींत. अशा स्थितींत तीं केलीं तरी हरकत नाहीं, इतकाच ह्या त्रयोदश आणि चतुर्दश सूत्राचा मथितार्थ आहे. बाकी सामान्य लोकांना मोहोत्पादक मदिरा मंदिरें आणि वेश्यागृहें जितकीं त्याज्य वाटतात तितकेंच हे असत्यप्रिय, असत्यमय जग सत्यनिष्ठ ज्ञानमार्गी पुरुषांना त्याज्य वाटत असल्यामुळेच " **विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि** " ही ज्ञानलक्षणें होत ( भ. गी. १३. १० ) असें श्रीकृष्णांनीं म्हटलें असून, निदान **साधकावस्थेंत तरी अरण्यवास अवश्य आहे**, असें आपलें मत " **आधीं केलें मग सांगितलें** " म्हणणाऱ्या श्रीसमर्थांनीं " **सदा सेवि आरण्य तारुण्य काळीं** " इत्यादि श्लोकांत स्पष्टपणें जगाला सांगितलें आहे. श्रीरामदास प्रायः जनसंगापासून दूरच रानावनांत किंवा डोंगरांत रहात असत.

## सूत्र १५. तल्लक्षणानि वाच्यंते नानामतभेदात् ॥

आर्या. भिन्नत्वानें वदती, भक्तीचीं लक्षणेंहि ब्रह्मर्षी ॥
तीं सारीं साईला, प्रिय होतीं तेविं इतर संतांना ॥

**विवरण**:-प्रथम पहिल्या सहा सूत्रांत भक्तीची व्याख्या करून तिची वृद्धिगत होणारीं स्वरूपें व फळें सांगितलीं; आणि तदनंतर ह्याच्या मागील आठ सूत्रांत शास्त्रीय व लौकिक व्यवहारासंबंधीं कर्मातीत संन्यासी सिद्धांचा अंतर्बाह्य व्यापार कसा चालतो, तें सांगितलें. आतां ह्या पंधराव्या सूत्रापासून चोविसाव्या सूत्राच्या समाप्तिपर्यंत दहा सूत्रांनीं भक्तांच्या ठायीं भक्तीचें जें मानसिक स्वरूप

असते, त्याच्या व्यक्तत्वाचे ब्रह्मर्षित्रयकथित प्रकार प्रथम सांगून त्यापुढें श्रीनारदांनी त्याविषयींचें स्वमत सोदाहरण प्रदर्शित केलें आहे. श्रीमन्नारद हे श्री वाल्मीकि-व्यासादिकांना गुरुस्थानीं असून "**देवर्षीणां च नारदः**" ( भ. गी. १०-२६ ) ह्या भगवदुक्तीने सकल देवर्षींमध्येंहि त्याना श्रेष्ठ स्थान दिले आहे, ह्यावरून त्याचेच भक्तिविषयक मत श्रेष्ठ ठरून भगवान् श्रीकृष्णानाहि तेंच मान्य होतें, असा ह्या दहा सूत्राचा तात्पर्यार्थ आहे.

**सूत्र १६. पूजादिष्वनुराग इति पाराशर्यः ।**

**आर्या.** पूजादिक कर्मी जें, उत्कृष्ट प्रेम तेंचि सद्भक्ती ।
ऐशी व्यासोक्ति असे, स्वीकारी तीहि सर्वदा साई ॥

**विवरणः**-श्रीमद्भगवद्गीतेच्या चतुर्दशोध्यायांत गुणमयी मायेचीं त्रिगुणात्मक कार्यें सांगून सप्तदशाध्यायांत त्यांच कार्यांची विभागणी त्याना कारणीभूत असलेली जी त्रिविधा श्रद्धा, तिच्या अन्वयें केलेली आहे. आणि षोडशाध्यायात मायोद्भूत त्रिगुणापैकीं रजोगुण व तमोगुण हे आसुरी असून फक्त सत्वगुण मात्र दैवी आहे असें सांगितलें आहे. ह्या दैवी संपत्तीचीं जीं एकंदर सव्वीस लक्षणे अध्यायारंभींच्या तीन श्लोकांत सांगितलीं आहेत त्यांमध्यें

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।
ज्ञानयोगेन साङ्ख्याना कर्मयोगेन योगिनाम् ॥ (भ. गी. ३-३ )

( अर्थ-**आर्या**--मोरोपंत )

या लोकीं पूर्वी म्यां निरूपिली दोंपरी बरी निष्ठा ।
जो ज्ञानयोग तेणें सांख्यां योग्यासि कर्मयोगानें ॥

ह्या श्लोकोक्त द्विविधा निष्ठेपैकीं सांख्यांची "**ज्ञानयोगव्यवस्थितिः**" हा तृतीय लक्षण आहे, असें म्हटलें असून कर्मयोग—निष्ठेचा त्या सव्वीस लक्षणांत कोठेंच नामनिर्देशहि केलेला नाहीं; इतकेंच नव्हे, परंतु गुणमयी मायेच्या गुणा-

शिवाय ह्या जगात अन्य कोणीच कर्ता नसून स्वात्मस्वरूप हे गुणराहित्यास्तव कर्मातीत आहे, असें ज्याला स्वस्वरूपज्ञान होतें, तो भगवत्स्वरूपी होतो ( भ. गी १४--१९ ), असे सांगून **ज्ञानकर्मसमुच्चयाची** असंभाव्यता सिद्ध केली आहे. सदर सव्वीस लक्षणात " **सत्त्वसंशुद्धि** " म्हणजे **चित्तशुद्धि**, हें द्वितीय लक्षण होय, असे म्हटलें आहे. ही **चित्तशुद्धि** ( बुद्धियोग ) झाली म्हणजेच नंतर **ज्ञानयोगव्यवस्थिति** होते, असा ह्या द्वितीय व तृतीय लक्षणांचा कार्यकारणसंबंध आहे; आणि **चित्तशुद्धीचें** कारण एकनिष्ठ भक्ति असल्यामुळें ( भ. गी. १०--१० व १८--५७ ) भक्तियोगद्वारें ईश्वरप्रसाद होऊन पुरुष **बुद्धियुक्त** झाला म्हणजे तो **कर्मातीत** ( भ. गी. २--५० ) अतएव **सिद्ध** होतो. ह्या सूत्रात भक्तीचे जे श्रीमद्व्यासोक्त लक्षण सांगितलें आहे, तें अशा सिद्ध पुरुषाच्या भक्तीचे होय, असे सकल पूर्वसूत्रानुसंधानावरून सहजच लक्षात येईल.

सूत्रोक्त " पूजादिषु " ह्या शब्दात ( १ ) नित्य, ( २ ) **नैमित्तिक**, ( ३ ) **प्रायश्चित्त**, आणि (४) **उपासना** इतक्या कर्मांचा समावेश होत असून **नित्य** कर्मांतील पंचमहायज्ञात **यज्ञ, दान** व **तप** हीं तिन्हीं कर्में अंतर्भूत होतात; आणि भगवद्गीतान्वयें **कार्य** म्हणून जीं कांहीं अपरिहार्य प्रारब्धेतर **पावन** कर्में आहेत, तीं इतकींच होत, असें अध्याय १८, श्लोक ५ ह्यात दोनदां आलेल्या " **एव** " ह्या शब्दानें स्पष्टपणें सिद्ध होत असून " **यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्रलोकोऽयं कर्मबंधनः ॥** " (भ. गी. ३.९) ह्या श्लोकार्धातील "**यज्ञ**" ह्या शब्दाचा जो स्पष्टार्थ पूर्वी द्वितीय सूत्राच्या विवरणांत सांगितला आहे, त्यावरून पंचमहायज्ञाशिवाय **कार्य यज्ञ कर्म** अन्य नाहीं, असें लक्षांत येईल.

प्रत्येक **त्रैवर्णिक गृहस्थानें स्वाश्रमकालांत** पंचमहायज्ञ करावयाचा निश्चय केल्यास मनुष्य यज्ञद्वारा अन्नावाचून राहण्याची पाळी कोणासच येणार नाहीं; आणि ह्या समाज-सेवेबरोबर काम्यकर्मत्यागद्वारें श्रद्धामूलक एका-

निक भक्तीच्या ठायीं चित्तस्थैर्य करण्याचा अभ्यास होऊन त्याच्या दृढतेने वैराग्य मूलक मुमुक्षुताहि सहजच लाभेल. परंतु आमच्या मा--बाप सरकारच्या पुण्याईनें आम्हाला लहान मुलाच्या पोटापुरते सुद्धा दूध न मिळण्याचे दिवस प्राप्त होऊन चाळीस शेराच्या ऐवजी रुपायाला चार--पाच शेर तांदूळ, गहूं घेण्याची पाळी आली आहे. तेव्हा पंचमहायज्ञ सहज यथासाग होण्यास अवश्य असलेल्या दूधदुभत्याच्या वगैरे अभावीं " आधीं पोटोबा आणि मग विठोबा" अशी काळजी लागून आम्हीं आपल्या आत्मोन्नतीच्या मार्गाला पारखे झालों, ह्याचे आद्य कारण चौदाव्या सूत्राच्या विवरणांत सांगितल्याप्रमाणें आमची साम्राज्यहानि हेच होय. आणि ती झाल्यापासून आज हजारो वर्षें " **न नीचो यवनात्परः** " ह्या उक्तीचा आमचा अनुभव सारखा वाढतच आहे. आता ह्यापुढे अशा स्थितींतून आमची मुक्तता परमेश्वरावांचून कोण करणार ? आणि प्रस्तुत सूत्रोक्त साधनाशिवाय तो तरी कृपा कशी करणार ?

**सूत्र १७**-कथादिष्विति गर्गः ॥

**आर्या** हरि गुण गानीं श्रवणीं, प्रेम असे तीच थोर भक्ति असे ॥
गर्गाचार्य वदति हें साईप्रभु मान्य करितसे तेंही ॥

**विवरणः कीर्तन** म्हटलें कीं त्याच्या बरोबर **श्रवण** हे सहजच येते. श्रीमद्भागवतांत जी नवविधा भक्ति सांगितली आहे, तिचा **श्रवण** हा पहिला प्रकार असून **कीर्तन** हा दुसरा प्रकार होय सकल **श्रवणभक्ति** करणारांमध्यें सात दिवसांत सावंत श्रीमद्भागवत प्रथमतः श्रवण करणारा महाराजा **परीक्षिति** ह्याला श्रेष्ठ म्हटलें आहे; आणि त्याला तें कथन करणारे **श्री शुक्राचार्य** हे सकल **कीर्तनभक्ति** करणारांमध्यें श्रेष्ठ गणले आहेत. **स्मरण** हा तिसरा प्रकार असून त्यांतील श्रेष्ठ स्थान प्रल्हादास दिलेलें आहे. **पादसेवन** हा चौथा प्रकार आहे; त्यांतील आद्य स्थान **श्री लक्ष्मीला** मिळालें आहे. पाचवा प्रकार **अर्चन** होय व राजा **पृथु** ह्याला त्यांतील अग्रस्थान दिलें आहे. **वंदन** हा सहाव्या प्रकारांतील प्रथमस्थान अक्रूर घेऊन बसला. सातवी **दास्य** भक्ति **श्री मारुति**-

रायासारखी कोणीच केली नाही. आठवी सख्यभक्ति श्रेष्ठपणें अर्जुनाच्याच वांट्यास आली. आणि नववा प्रकार जो आत्मनिवेदन त्यांतील अग्रेसरत्व बलिराजाला मिळालें. ह्या नऊ भक्तश्रेष्ठांपैकीं श्री मारुती आणि बलिराजा हे चिरंजीव आहेत. सर्व सात चिरंजीवाचीं नावें अशीं आहेत:—

"अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च बिभीषणः ।

कृपः परशुरामश्च सप्तैते चिरंजीविनः ॥"

भक्तीचे श्रवण आणि कीर्तन हे जे आद्य दोन प्रकार आहेत, ते श्रीमद्भागवतःच्या साह्यानें उत्तम प्रकारें साधतात, ह्यास्तव त्या ग्रंथाला सकलभक्तिमार्गी संतानीं अग्रस्थान दिलें असून संतमुकुटमणि श्रीतुकारामाच्या "गीता भागवत पहावें" ह्या उपदेश-वाणीवरून श्री गीतासुद्धां भागवताच्या बरोबरीनें भक्तिमार्गांत बसली आहे असें ठरते. श्रीज्ञानेश्वरांना ती जी अति वंद्य झाली होती त्याचें कारणही तिची शुद्ध भक्तिमयताच होय. आणि

**सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ।**

**नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥**

(भ. गी. ९-१४)

ह्या श्लोकांत प्रस्तुत सूत्रोक्त गर्गाचार्यांच्या कीर्तनरूप भागवतधर्माचा गौरव केलेला असून कीर्तनांत सतत रममाण होणाऱ्या सकल कर्मातीत सिद्धांना नित्ययुक्त असें म्हणून गीतेंत शुद्ध भक्तियोगासच प्राधान्य आहे हा सिद्धांत भगवंतांनीं दृढ केला आहे. त्याचप्रमाणें

**"युक्त आसीत मत्परः ।" (भ. गी. २-६१)**

**"श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः" ।**

(भ. गी. १२-२०

"मयि चानन्य योगेन भक्तिरव्यभिचारिणी।"

(भ. गी. १३--१०

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते।

"स गुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ॥"

(भ. गी. १४--२६

ह्या उक्तींनी **स्थितप्रज्ञ, भक्तोत्तम, ज्ञानी** आणि **गुणातीत** अशा चारच प्रकाराने ज्या जीवन्मुक्त संन्यासी पुरुषांचें भगवद्गीतेत वर्णन केलेलें आहे, त्यांत आणि त्याच्या आचारांत शुद्ध भक्तीसच प्राधान्य दिलें असल्याकारणाने गीतेंतील **कर्मयोग हें भक्तियोगाचें उपनाम** मात्र आहे असें म्हणणें प्राप्त आहे. तात्पर्य, अखिल श्रीगीतेला केवळ भक्त्यात्मकत्व निःसंशय प्राप्त होत असल्याकारणानें हीं ८४ भक्तिसूत्रें आणि गीता हीं सर्वस्वीं एकात्मकच आहेत.

**सूत्र १८. आत्मरत्यविरोधेनेति शांडिल्यः ॥**

**आर्या.** आत्मरतीला देउनि, भक्तीमाजीं बहूत थोरपणा।
गौरविली शांडिल्यें, सहजानंदींच राहतो साई ॥

**विवरणः**—दुसऱ्या सूत्रांत भक्तीची जी व्याख्या केलेली आहे, तिच्याशीं शांडिल्यांच्या ह्या भक्तिलक्षणाची एकात्मता आहे. "**अहं ब्रह्मास्मि**" ह्या महावाक्याचें अपरोक्ष ज्ञान होऊन बुद्धि केवळ शुद्ध व्यवसायात्मिका झाली, म्हणजे पुरुष "**आत्मन्येवात्मना तुष्टः**" (भ. गी. २--५५) असा, अर्थात् स्थितप्रज्ञ होतो, आणि ही स्थिति कायम झाली म्हणजे जीव सदासर्वदा निजानंदांत निमग्न होऊन जातो. कोणत्याहि निमित्तानें ह्या सहजानंदाचा वियोग न होणें, असा प्रस्तुत सूत्रोक्त भक्तिलक्षणाचा अर्थ आहे. परंतु देहधारी जिवाची अशी सहज समाधि देहपातापर्यंत अखंड राहणें प्रायः शक्य नसतें, हें लक्षांत आणून श्रीमन्नारदांनीं आपल्या एतदुत्तर-सूत्रोक्त भक्तिलक्षणांत प्रस्तुत सूत्रोक्त लक्षणाची पूर्तता केली आहे.

" एका म्यानात दोन तरवारी रहात नाहींत " ह्या प्रत्यक्षानुभवानुसार एका अंतःकरणामध्यें मिथ्या देहात्मबुद्धि आणि सद्ब्रह्मात्म बुद्धि एकाच कालीं राहाणें शक्य नाहीं. ह्यास्तव प्रथमतः देहात्मबुद्धीला स्थानभ्रष्ट करून ब्रह्मात्मैक्य-बुद्धीसाठीं वसतिस्थान निर्माण केलें पाहिजे. हें स्थान निर्माण करण्याचे उपाय ( १ ) श्रवण ( स्वाध्याय ), ( २ ) मनन, आणि ( ३ ) निदिध्यासन असे तीन आहेत. ह्यांच्यायोगें ( १ ) नित्यानित्यवस्तु विवेकपूर्वक ( २ ) इहामूत्रफलभोगविराग उत्पन्न होऊन ( ३ ) शमदमादि षट्काचा लाभ झाला म्हणजे ( ४ ) मुमुक्षुता उद्भूत होते; आणि नंतर प्रशस्त सत्कर्माच्या साच्या बलानें ( भ. गी. १७--२३ ते २७ ) बुद्धि व्यवसायात्मिका झाली ( भ. गी. २ -४१ ते ४५ ) म्हणजे ईश्वरप्रसादानें परोक्षज्ञानप्राप्तिद्वारा ( भ. गी. १८--४६ ) संसिद्धि लाभ होऊन शेवटीं सर्वकर्मसंन्यासद्वारा सर्वश्रेष्ठ नैष्कर्म्यसिद्धिनामक ज्ञानमूलक मुक्ति मिळते. ( भ. गी. १८-४९ ते ५५ ) असे मुक्त पुरुष सदासर्वदा आत्मरतींत निमग्न असतात; आणि असें निमग्न असणें, हेंच भक्तिशास्त्रजनक शांडिल्याचें भक्तिलक्षण होय.

फक्त व्यावहारिक नीति मात्र खरी आहे; आणि बाकी धर्म, परमेश्वर, ब्रह्म, ह्यांच्याविषयींच्या सर्व कल्पना भ्रममूलक असून अहितकारक आहेत, अशीं मतें प्रतिपादन करणाऱ्या, अर्थ्या हळकुंडानें पिवळे झालेल्या, प्रस्तुत कालच्या नास्तिकांच्या सहस्रपट कुतर्कवादी लोक पूर्वी चार्वाकादि होऊन गेलेले असून त्या सर्वांचीं तोंडें श्रीहर्षमिश्रांनीं आपल्या खंडनखाद्य नामक ग्रंथांत अगदीं बंद करून टाकलीं आहेत, असें श्रीविद्यारण्य स्वामींनीं आपल्या पंचदशी नामक ग्रंथांत म्हटलें आहे. खंडनखाद्य नामक ग्रंथाचा नुसता अर्थ समजणें सुद्धां फार कठीण आहे, असें आमचे मित्र सुप्रसिद्ध वेदान्ती, ब्रह्मीभूत सच्चिदानंद स्वामी (केशव शास्त्री दामले) हे म्हणत असत. मग त्या ग्रंथांतील प्रमेयांचें निरसन करण्याचें नांवच नको. " जीवो ब्रह्मैव नापरः " असें वेदान्तशास्त्र म्हणत आहे, त्याचा विचार केला तर सगुणस्वरूपी परमेश्वर नाहीं, असें म्हणणारी मनुष्यें मी

नाहीं" असें म्हणणारा ठरतो! तेव्हां अशा वेडप्याशीं वाद करणार कोण? बरें, परमेश्वर जीवाहून भिन्न आहे, असें म्हटल्यास त्याच्या सर्वव्यापित्वास बाध येतो. आणि जीव त्याचा अंश आहे असें म्हटल्यास तो विभाज्य ठरून त्याची अविकार्यता नष्ट होईल.

**सूत्र १९. नारदस्तु तदर्पिताखिलाचारता तद्विस्मरणे परम व्याकुलतेति ॥**

**आर्या.** कर्मे सर्व तदर्पण, त्यासि विसरतांचि हृदय घाबरतें।

श्रीनारदमत ऐसें, "अल्ला मालिक" अखंड सांइ वदे ॥

**विवरण:**—अपरिहार्यत्वें घडणारे केवल ईश्वरनियमोद्भूत प्रारब्धकर्म, (भ. गी. ३-३३ व १८-५९), आणि विकर्माकर्म त्यागपूर्वक बुद्धिपुरःसर केलेले यज्ञ, दान, तप व यज्ञशेषाहार (भ. गी. ३-१३)रूपी कार्यकर्म (भ. गी. ३-१९), ह्या सर्वांचा ईश्वरार्पणरूपी त्याग केला असतां त्याच् संन्यासयोगयुक्ततेनें जीव सकल शुभाशुभ फलदायक कर्मबंधांतून सुटून ईश्वरप्रसादानें ज्ञानप्राप्तिद्वारे मुक्त होतो, (भ. गी. ९-२७ व २८) असा जो सिद्धान्त श्रीकृष्णांनीं अर्जुनास कथन केला, त्याच्याशीं प्रस्तुत सूत्राचा प्रथमार्ध समानार्थी असून उत्तरार्धानें भक्तश्रेष्ठांच्या प्रेमातिशयाचें वर्णन केलें आहे. ह्या लक्षणाची मौज अशी आहे कीं, ते साधकांपासून मुक्तापर्यंत सर्वांना लागू पडतें. अशी भक्ति असणें, हें साधकांचें श्रेष्ठ साधन आहे; व तीच मुक्तांचें स्वरूप-लक्षण आहे (भ. गी. १२-१३ ते १५). ह्याचें सर्वोत्कृष्ट उदाहरण गोकुलवासी गोपिकांचें आहे. श्रीकृष्णानें बाल्यावस्थेंत जे कल्पनातीत, अलौकिक, अद्भुत चमत्कार केले, ते त्यांनीं स्वतः प्रत्यक्ष पाहिले असल्यामुळें त्याच्या योगेश्वरत्वाविषयीं त्यांना यत्किंचितही शंका घेण्यास जागा नव्हती; ह्या कारणास्तव त्याच्या ईश्वरत्वाबद्दल त्यांची पक्की खात्री झाली होती. अशा देहधारी परमात्म्याचा वियोग एकक्षणही त्यांना म्हणूनच असह्य व्हावा ह्यांत नवल तें काय! अतिप्रिय व्यक्तीचा यत्किंचित् तरी वियोग किती दुःखद होतो, आणि तो कायमचा झाल्यास मनुष्य कसा वेडा

होऊन जातो, ह्याची कल्पना ज्याला तसा अनुभव आला असेल त्यालाच करतां येईल; आणि असा अनुभव आलेल्या मनुष्यालाच गोपींच्या प्रेमाचें रहस्य कळेल. " ॥ **ऐशी प्रेमळाची जाती** ॥ करी लाभावीण प्रीति ॥ " असें श्री तुकारामांनीं खऱ्या प्रेमाचें लक्षण सांगितलें आहे, तें ह्या जगांतील सामान्यतः " ताकापुरतें रामायण " अशा प्रकारचें प्रेम असणारांना कसें कळावें ? गोपी वेड्या नव्हत्या. कल्पनातीत, अमानुष चमत्कार करण्याचें सामर्थ्य श्रीकृष्णाच्या बालदेहांत असणें शक्य नाहीं, हें त्यांना पूर्णपणे कळत होतें. श्रीमन्महा भारतस्थ शांतिपर्वांतर्गत अध्याय २८०--८१ मध्यें श्रीभीष्मांनीं महाराजा युधिष्ठिरास जे श्रीकृष्णाचें वर्णन केलें, तें असें आहेः—" आपला हा श्रीकृष्ण कांहीं देवाधिदेव महाविष्णु नव्हे. सच्चिदानंद अनंत अशा परमात्म्याला महादेव म्हणतात. त्याला मायेचा कसला तो विटाळही नाहीं. ( मग असले नाक डोळे कोठले ? ) तोच पुढें मायासंवलित झाला म्हणजे त्याचेंच स्वरूप चिदचिदात्मक असें मिश्र होऊन त्याच्या ठिकाणीं षड्विध ऐश्वर्य निर्माण होतें; त्यामुळे त्याला भगवान किंवा कारणात्मा म्हणतात. ही दुसरी पायरी. ह्याच बीजस्थानी कारणात्मा पुढें कार्यब्रह्मरूपी ( विश्वात्मक ) बनतो; ही तिसरी पायरी. ह्या वृक्षस्थानीय कार्यब्रह्मरूपी स्थितीच्या पुढची फलस्थानीय अशी जी चौथी अवस्था ती ह्या श्रीकृष्णाची स्थिति होय. म्हणजे श्रीकृष्ण हा महादेवाचा अष्टमांश आहे. असें जरी आहे तरी स्वकीय जी ब्रह्मता तिचें ह्याला सदासर्वदा पूर्ण भान असल्यामुळें त्याच्या ब्रह्मस्वरूपाची आणि ईश्वरत्वाची हानि किमपिही झालेली नाहीं. " श्रीकृष्णाच्या अंतर्बाह्यस्वरूपाचें अशाच प्रकारचें ज्ञान गोपींनाही प्रत्यक्ष झालें होतें; आणि ह्याच कारणास्तव त्याच्यावर अखंड निःसीम प्रेम करून त्या मुक्त झाल्या. त्यांच्यासारख्या भक्तीचें पंडितांनीं असें वर्णन केलें आहेः

अहो येतां जातां उठत बसतां काम करितां ॥

सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां ॥

घरीं-दारीं शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं ॥

समस्ताची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करी ॥

अशी भक्ति करणें हा मुक्तीचा निश्चित आणि सोपा असा मार्ग आहे ( भ गी ८–९ व १४ ), ह्यांत शंका नाहीं.

आतां " **ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव ना परः** " ह्या अखिल वेदान्तसारभूत श्लोकार्धाचा व्यावहारिक नीतिदृष्ट्या तात्त्विक विचार करूं. अनंत कालाच्या मानानें हजारों वर्षें, किंबहुना लाखों वर्षें देखील क्षणमात्र आहेत, हा अबाधित सिद्धान्त प्रस्थापित करण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं; आणि त्याच-प्रमाणें " **यद्दृष्टं तन्नष्टम्** " ( दिसतें तें लया जातें ) ह्या सिद्धांतालाही विचार-दृष्ट्या बाध येत नाहीं. तेव्हा " **आज आहे उद्यां नाहीं ऐशियासि म्हणसी कायी ?** " असा प्रश्न केल्यास " **स्वप्नवन्मिथ्या** " असास जबाब देणें भाग आहे. मग अशा साद्यंत अव्यक्त, अदृश्य, अतएव मिथ्याभासात्मक असलेल्या ( भ. गी २–२८ ) जगाच्या अपरिहार्य दृश्यत्वादृश्यत्वाबद्दल म्हणजे उत्पत्ति–स्थिति–लयाबद्दल हर्ष शोक मानण्यांत काय अर्थ आहे ? स्वप्नावस्थेंत सत्यत्वानें भासणारे आभास जसे क्षणिकत्वास्तव आपण मिथ्या समजतों, तसे अनंत कालाच्या मानानें क्षणिकच असलेले जाग्रता-वस्थेंतील आभास मिथ्या नव्हेत, असें म्हणणें न्याय्य कसें होईल ? त्याच-प्रमाणें स्वप्नावस्थेंतील आभास अपरिहार्य असल्यामळें त्यांच्यासंबंधीं आपण परवशतेस्तव जसें औदासिन्य ठेवितों, त्याचप्रमाणें जाग्रतावस्थेंतील आभासहि अपरिहार्य असतां त्यांच्यासंबंधीं प्रारब्धवशतेस्तव आपण औदासिन्य कां ठेवूं नये ? पुरुष प्रयत्नानें त्यांच्यांत बदल करितां येतो, असें म्हटलें तर दुःखकारणनाशार्थ आणि सुखकारणलाभार्थ प्रत्येक पुरुष अहर्निश आमरण प्रयत्न करीत असतांही त्याला अनंत दुःखें प्राप्त होत असतातच, मग पुरुषका-राचा काय उपयोग ? प्रयत्नांवाचूनही कधीं कधीं आकस्मिक सुखसाधन–लाभ

होतोच. मग पुरुषकाराची मातब्बरी काय? सुखदुःख, लाभालाभ ह्यासंबंधीं जिवाची प्रारब्धवशता, आणि त्यांचें अपरिहार्यत्व मनांत आणूनच त्यांच्याविषयीं उदासीन राहाण्याचा (भ. गी. २--३८) भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाला उपदेश केला आहे. हा उपदेश मनांत पक्का बिंबल्यावर मनुष्य कोणत्या अप्राप्त वस्तूच्या प्राप्तीची काममूलक खटपट करील? तो उपदेश पटला म्हणजे प्रथमतः कामजनक संकल्पाचेंच (भ. गी. ६-२४) निर्संतान होणार; आणि कामाचा असा समूळ नाश झाला म्हणजे क्रोध-लोभ नामक त्यांची संततिही सहजच नष्ट होणार. अशा प्रकारे पापकर्मजनकत्वास्तव त्रिविध नरकद्वार (भ. गी. १६-२१) बनलेल्या काम-क्रोध-लोभरूपी आत्मनाश करणाऱ्या शत्रूंचा ज्या अतुलपराक्रमी पुरुषानें स्वसामर्थ्यानें नाश केला असेल, त्याच्याकडून व्यावहारिक नीतिदृष्टया कोणतें अनीतीचें कर्म घडणें शक्य आहे? असा "देहोऽहंभाव" गेलेला पुरुषच खरा स्वार्थत्याग करूं शकेल आणि स्वार्थत्याग झाला म्हणजे सर्वभूतहितसाधकता त्याच्या जागीं सहजच येऊन बसणार! एवंच खऱ्या वेदान्त्यासारखा महा नीतिमान् परहितकारी पुरुष मिळणें असंभवनीय आहे.

आतां वेदान्त्याच्या दुकानदारीवर आणि दांभिक साधुत्वावर आपलें स्तोम माजविणारे काहीं धंदेवाईक पुरुष जगांत आहेत हें खरें आहे, परंतु त्यांच्या पातकाचे खरे वाटेकरी स्वतः ते आणि त्यांचे अप्रबुद्ध भक्त हेच होत. खऱ्या वेदान्त्याच्या किंवा सत्पुरुषांच्या माथीं त्यांच्या पातकाचें खापर फोडणें, हें बुद्धिमांद्यजन्य नीचत्व होय. शिवाय ह्या दांभिक पारमार्थिकांपेक्षां व्यावहारिक धंदेवाईकांत अप्रामाणिक लोक सहस्रपटीनें जास्त असून त्यांच्या प्रतिष्ठित पणांत त्यांच्या दुराचरणानें म्हणण्यासारखें न्यूनत्वही येत नाहीं, असा जगाचा न्याय आहे, तो निराळाच! "नावडतीचें मीठ आळणी" ठरतें, ह्याला कारण "थळी तो कान पिळी" हा जगाचा न्यायच होय.

सूत्र २० ॥ अस्त्येवमेवम् ”

आर्या:—“ मम लक्षण सत्य असे, ” पुनश्च ऐसेचि नारदें कथिलें ।
जैं देहभान राहे, तैं आहे सत्य ते म्हणे साई ॥

विवरण:—पूर्व सूत्रांतील भक्तिलक्षणाचें अगदीं बरोबर आहे, असा जो ह्या सूत्राचा अर्थ आहे तो आर्येच्या पूर्वार्धांत आला असून उत्तरार्धांत त्याचाच थोडासा विस्तार केला. जागृतावस्थेशिवाय इतर स्वप्न, सुषुप्ति आणि समाधि ह्या तीन अवस्थांपैकीं स्वप्नावस्थेंत जीं केवळ मानसिक कर्में होतात, त्यांचा पूर्वसूत्रोक्त कर्मांशीं संबंध नसतो, आणि सुषुप्तींत व समाधींत कर्माभाव असतो. ह्या समाध्यवस्थेचें वर्णन पातंजल योगसूत्रें, वाल्मीकिकृत उत्तर रामायण (योगवासिष्ठ), हठ योग प्रदीपिका, ज्ञानेश्वरी, इत्यादि ग्रंथांत अनुभवी, व तज्ज्ञ पुरुषांनीं आपल्या अधिकारयुक्त वाणीनें केलेलें असल्यामुळे, ते प्रस्तुत कालीं अगम्य असलें तरी त्याला मिथ्या म्हटल्यास “ अंधळ्यासीं जन । सारेचि आंधळे ॥ ” अशी स्पेन्सरशाही मात्र होईल.

(अपूर्ण)

# परमार्थप्रपा.

**संत ओळखावे कसे ?**:—आतां अमुक ते संत व अमुक असंत हें ओळखावे कसें हा मोठा प्रश्न आहे. कारण जगात असतच फार व ते संत या सदराखालीं बराच काळपर्यंत वावरत राहिल्यामुळें त्यानीं दांभिकपणे संभावितपणाच्या आणलेल्या बेमालूम सोंगाच्या गोडगोड बतावणीला बळी पडून सर्वस्वास मुकलेले व अनूतून उठलेले त्यांचे पश्चात्ताप पावलेले शिष्य ( पुरुष व स्त्रिया ) जगात काय थोडे आहेत ? अगदीं हुबेहूब खऱ्यासारखें दिसणारें खोटेंच जगांत फार पसरलेले आहे. त्याचप्रमाणें अशा ढोंगी साधूंच्या जाळ्यांत सहजगत्या अडकणाऱ्या अनधिकारी शिष्यांचाही जगांत मोठा भरणा. जसे जगांत खरे संत विरळा तसा खरा अधिकारी शिष्यही विरळा. यापैकीं तूर्त वाचकांस खऱ्या संतांची ओळख करून देऊं

**निरपेक्षता**:—प्रथमत: संत हा अत्यंत निरपेक्ष असावा लागतो. एकाद्या वस्तूचा लाभ होवो वा न होवो त्यामुळे संताच्या चित्ताच्या स्थिरतेवर बरावाईट परिणाम काहींही होणार नाहीं. कारण त्याचें चित्त निन्य भगवत्पदीं रतलेलें असतें. अमुक एक विषय मला पाहिजे ही अभिलाषबुद्धी संताच्या जीवाला शिवतही नाहीं. **ईश्वरचिंतन**—सदैव ईश्वरचिंतन हेंच त्याच्या चित्ताचें काम व तदितर विषयाचे अगर पदार्थाचे चिंतन म्हणजे भवबंधन असें तो समजतो.

निरपेक्षता हा संतांचा ठेवा आहे: त्याचें दुसरें लक्षण म्हणजे सतत ईश्वर वा आत्मचिंतन.

जागृति, स्वप्न व सुषुप्ती या तिन्हीं अवस्थांत संताचें चित्त चिन्मात्रस्वरूपीं जडलेलें असतें. देह संपत्तीच्या ढीगावर लोळो अथवा अकिंचनतेच्या वणव्यांत होरपळो, संताचें चित्त परमानंदांत लीन असतें. हें संतत्वाचें दुसरें लक्षण आहे.

**शांतत्व:**—शांतत्व हे संतांचें तिसरे लक्षण आहे त्यांच्या ठायीं काम-क्रोधादि दोषाचा वास यत्किंचितही नसतो. त्याच्या संबधीं कोणी प्राणांतही अपकार केला तरी अशावरही ते संत हे महादुष्ट आहेत अशी त्याच्या संबंधानें भावना मनात न ठेवता वेळेवर उपकारच करतील. कोणा दुष्टाने संताला ठकवून त्याच्या सर्वस्वाचा अपहार केला तरी अपहार तो अपहार नसून ते ब्रह्मार्पणच आहे अशी सताची निर्दोष भावना राहील व ठकविणाराबद्दलही ब्रह्मभावनाच राहील.

**समदर्शन:**—साराश, या शांतत्वापोटीं समदर्शन हा एक संताचा चौथा गुण आहे.

पाहूं जाता जग हें द्वैतद्वंद्व यांहीं भरलेले आहे. तरीही विषमाच्या ठिकाणीं सम पाहाणे ही दृष्टी संतांवांचून इतराची असणे शक्य नाहीं. संत हे नेहमी समदर्शी असतात.

**निर्ममत्व.**—हें समदर्शित्व अंगीं बाणावयास अहंममतेचा निःशेष त्याग करावा लागतो. हे संताचे ५ वे लक्षण आहे. देहाचे अभिमानापायीं अहंममता वाढते व अनंत अनर्थ ओढवतात अखिल जगांत मीच आहे अशा भावनेने ज्यानें त्याने आपले मीपण ओळखलें म्हणजे आपले जे साडेतीन हाताचे मीपणं ते सद्गुरुकृपेने विस्तृत होऊन संपूर्ण जग मीच आहे असें वाटूं लागेल. असें वाटता वाटता संपूर्ण त्रैलोक्य मी अशी वृत्ति होईल व असें झाल्यावर मी म्हणणाराही दुसरा कोणी न उरून मीही निर्मम होईल. हे निर्मम होणे हे संताचे एक लक्षण आहे.

**निरहंकारता व निर्द्वंद्वता:**—निर्मम व निरहंकार झालेल्यावर द्वंद्वदुःखाचे डोंगर जरी कोसळले तरी त्यापासून संताना बाधा कशी ती अणुमात्रही होत नाहीं. देह वाघाच्या तोंडांत सांपडो, की पालखीपदस्थ होवो त्याचे सुखदुःख संतास नाहीं. म्हणून निर्द्वंद्व असणें हें एक संताचे लक्षण आहे.

**निष्परिग्रहता**:—संत हे निष्परिग्रह असतात. स्वजन, स्वधन, स्वस्त्री, स्वपुत्र यांच्या मध्यें नांदत असताही त्यापैकीं कशांतही ते लिप्त नसतात. स्वप्नांतले व्यवहार स्वप्नात जरी सत्य वाटले तरी जागृतींत आल्यावर ते जसे कोणासही मिथ्या वाटतात तसे संत हे जागृतींतले संसृतीचे व्यवहार स्वप्नस्थितींतल्या व्यवहाराप्रमाणें मिथ्या समजतात. कारण त्यांची जागृती म्हणजे स्वस्वरूपावस्थान ही आहे.

साराश, अशा आठ लक्षणांनीं मंडित तो संत समजला जावा.

या लक्षणांविरहित असे जे जे असताल त्यांचा समागम कधींही सुखावह होणार नाहीं. त्यांच्यापासून निजकल्याणेच्छू जीवाने नेहमीं दूर असावे. त्यांचा संग नेहमी बाधकच होईल. उपरिवर्णित संतसंगतीनें जीवाची देहासक्ति कमी होईल. अशी संगती लाधावयास मोठें भाग्य लागतें. अशांच्या संगतींत भगवद्गुणानुवाद कथन हाच विषय असावयाचा आणि चित्तशुद्धीचें अति सुगम वर्म जर कांहीं असेल तर तें हेंच.

**हरिकथाश्रवण**:—हरिकथाश्रवणानें जी चित्तशुद्धि होईल ती अष्टांगयोगसाधन व नानाप्रकारचे याग केल्याने अथवा वेदाध्ययनानेही होणार नाहीं. येथे कोणी अशी शंका घेईल कीं, हरिकथाश्रवणानें जर एवढा थोर लाभ होतो तर मग या लाभाचा फायदा पुष्कळ लोक कां घेत नाहींत? या शंकेचें समाधान एवढेच कीं, हा लाभ घ्यावयाची इच्छा होण्यास सुद्धां भगवत्कृपाच पाहिजे.

नित्य हरिकथाश्रवणानें श्रवण करणाराचें मन ईश्वरपर होऊन तें अखंड हरिस्मरणांत राहतें व त्याच्या सर्व क्रिया हें एक अखंड हरिभजनच होऊन जातें. लहान वा थोर अशा ज्या ज्या वस्तूवर तो आपली दृष्टि फेंकील ते ते त्याचें हरिदर्शन. तो जें कांहीं बोलेल तें त्याचें हरिस्तवन. असें होतां होतां त्याच्या यच्चावत् सर्वेंद्रियांचे व्यापार हरिमय होऊन जातील.

या भक्तीपुढे चारही मुक्तींचा काय पाड? सत्संगतीने वैराग्य उत्पन्न होते व वैराग्य हा परमार्थाचा अन्तात्मा आहे. व विरक्तीवाचून भगवत्प्राप्ति नाहीं. आतां ही भगवद्भक्ति करण्याला कांहीं सीमा आहे काय? याचें उत्तर सोपे आहे व तें हें कीं, ही भक्ति करणारा भगवद्रूप झाला कीं ही भक्ति आपोआपच थाबली.

**भवबंधनः**—आता संसाराचे भवबंधन कोणाला हें पाहूं. आत्म्याला म्हणावें तर आत्मा नित्यमुक्त अविनाशी चिद्घन कर्माकर्मरहित व त्रिगुणातीत अशा स्वरूपाचा असल्यामुळें त्याला संसाराची बाधा नाहीं. बरे देहाला म्हणावे तर देह जड, मूढ व अज्ञान असा आहे त्याला बाध कसा असू शकेल? बरें हा ससार मिथ्या म्हणावा तर हें सर्व जग यानें नाडले आहे.

आत्मा चिद्रूप व अविनाशी आहे. तो सगुण नाहीं व निर्गुणही नाही. तो कर्माकर्मातीत व पापपुण्यातीत असून प्रकृतीहून पर असा असून त्याच्या स्वप्रकाशदीप्तीनें चंद्रसूर्यादि प्रकाशमान होतात तेव्हां अशा आत्म्याला भवबंध संभवत नाहीं.

तेव्हां हा भवबंध जसा आत्म्याला नाहीं तसा तो देहालाही नाहीं. तर मग तो आहे तरी कोणत्या ठायीं म्हणून पाहूं जातां याचा अशा तऱ्हेचा विवेक जे जाणत नाहींत त्यांच्या ठायीं त्याचें वास्तव्य आहे असें म्हणणे प्राप्त येते व तेंच खरें आहे.

असे जे अविवेकी जीव ते या भवबंधांत कसे अडकतात ते थोडक्यांत सांगतों.

वास्तविक पाहाता देहाचा जीवाशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नसता मी स्थूल, मी कृश, मी गोरा, मी काळा हे देहाचे देहधर्म, किंवा मी काणा, मी मुका, मी बहिरा हे इंद्रियांचे धर्म, किंवा मला भूक लागली, मला तहान लागली हे प्राणाचे प्राणधर्म व तसेच काम-क्रोध-लोभादि मनाचे मनोधर्म वगैरे हे सर्व देहालाच मी

## अध्याय ५० वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

जन्मदाते मायतात । यांचिया उपकारा नाहीं अंत ॥
मानवदेह दिधला मजप्रत । उपजलों न जंत त्यां पोटीं ॥ १ ॥

झालों न सळ मातेच्या उदरा । अंध पंगू काणा तोतरा ॥
उपजलों ना मुका बहिरा । जन्मलों पुरा सुपिंड ॥ २ ॥

जयाचे देववंदी चरण । ऐसा जो उत्तम ब्राह्मणवर्ण ॥
तेथ मी ईश्वरकृपे अवतीर्ण । जाहलों पूर्ण देवाचा ॥ ३ ॥

जन्मोजन्मीं माता पिता । कोट्यानकोटी जन्म घेतां ॥
परी या जन्ममरणा चुकविता । तयाची दुर्मिळता अनिवार ॥ ४ ॥

जन्मदाता तोही पिता । दुजा मौंजीबंधन कर्ता ॥
तिजा अन्नमदानें पाळिता । चौथा भयभीता सोडविता ॥ ५ ॥

जगीं हे सर्व समसमान । परी कृपाळु सद्गुरूवीण ॥
खरा जनक नाहीं आन । नवल विंदान परिसावें ॥ ६ ॥

जननी गर्भीं वीर्य निक्षेपिता । योनिद्वारा जन्मदाता ॥
होतो केवळ लौकिकी पिता । सद्गुरु जनिता अलौकिक ॥ ७ ॥

तो न वेंचितांवीर्याचा कण । नीच योनिद्वारावीण ॥
देऊनिया निजपुत्रा जनन । अनुग्रहपूर्ण करवीत ॥ ८ ॥

नमो त्या जन्ममरणनिवर्तका । करुणाघना ज्ञानप्रकाशका ।
वेदगुह्य सच्चित्प्रतिपादका । सर्व व्यापका गुरुवर्या ॥ ९ ॥

नमो संसारतमदिनकरा । आत्मानुभवसंतशेखरा ॥
भक्तचित्तचकोरचंद्रा । कल्पतरुवरा गुरुवर्या ॥ १० ॥

अगाध गुरुरायाचें महिमान ।. वर्णितां गळे वाचेचा अभिमान ॥
बरें असावें मुकिया समान । खाळवोनि मान गुरुचरणीं ॥ ११ ॥

पूर्वजन्मीं अनवच्छिन्न । नसतां कोणी तपःसंपन्न ॥
होई न तया संतदर्शन । त्रितापनिरसनकारक ॥ १२ ॥

परमार्थ मोक्ष वा निजहित । साधावें ऐसा जयासी हेत ॥
तेणें व्हावें संतांचे अंकित । उणे न यत्किंचित मग तया ॥ १३ ॥

धन्य धन्य सत्संगती । काय वर्णावी तिची महती ॥
तिये पासाव विवेकविरक्ति । परम शांती सद्भक्तां ॥ १४ ॥

साई केवळ चैतन्यमूर्ती । अव्यक्तचि ते आले व्यक्तीं ॥
काय त्यांची निर्विषय स्थिति ॥ कोण निश्चिती वानील ॥ १५ ॥

भक्त भावार्थी श्रोते प्रेमळ । तयांलागीं तोचि कनवाळ ॥
प्रेमें वदे निजचरित रसाळ । केवळ जें राऊळ तयांचें ॥ १६ ॥

शिरीं जयाचा पडतां कर । अहंभावाचा होई चूर ॥
सोहंभावाचा चाले गजर । आनंद निर्भर हृदयजात ॥ १७ ॥

काय मज पामरा शक्ति । वानावया तयांची कीर्ति ॥
ज्याचा तोच भक्तप्रीति । प्रकटवी पोथी कृपेने ॥ १८ ॥

लोटांगण त्या साईचरणां । अभिवंदन श्रोतृगणां ॥
नमन साधू संत सज्जनां । प्रेमालिंगन सकळिकां ॥ १९ ॥
सहज लीळेनें वार्ता सांगती । जयागर्भीं संपूर्ण नीती ॥
जयाचे लेणे नित्यशांती । महानुभाव ख्याती ज्या ॥ २० ॥
सूर्या उपमितां नाहीं सोई । कीं तो सूर्य अस्तास जाई ॥
चंद्रा उपमूं तरी तो क्षयी । सदैव संपूर्ण साई हा ॥ २१ ॥
तया चरणीं हेमाड विनित । प्रेमें श्रोतयालागीं विनवित ॥
परिसा जी कथा श्रद्धायुक्त । दत्त चित्त आवडीनें ॥ २२ ॥
भूमी उत्तम नांगरून । बीज ठेविलें आहे पुरून ॥
परी न वर्षतां तुम्ही कृपाघन । पीक तें निर्माण होईल का ॥ २३ ॥
पडतां संतकथा कानीं । पातकांची नुरे कहाणी ॥
पुण्यें अंकुरती कथा श्रवणीं । घ्या ह्या पर्वणीचा लाभ ॥ २४ ॥
सलोकतादिचारी मुक्ति । नलगे तेथें आम्हां आसक्ति ॥
जडो त्या साईची निश्चळ भक्ति । परम प्राप्ति हीच आम्हा ॥ २५ ॥
आम्ही मुळींचें नाहीं बद्ध । काय आम्हां मुक्तीचा संबध ॥
होवो संत भक्तीचा उद्बोध । तेणेंच कीं शुद्ध अंतर ॥ २६ ॥
जेथें न मीतूंपणस्फूर्ति । ऐसी जेका सहज स्थिति ॥
आम्हां व्हावी ते अभेदभक्ति । हेचि साईप्रति मागूं ॥ २७ ॥
आतां श्रोतयां हीच विनंती । वाचूं घेतां ग्रंथ हातीं ॥
वाच्य वाचन वाचक व्यक्ति । एकात्मस्थिती देखावी ॥ २८ ॥
सोडूनि द्यावें हेमाडपंतां । कीं तो न कर्ता या सच्चरिता ॥
केवळ भक्तांचिया निजहितार्थी । कारण निमित्त तो एक ॥ २९ ॥
दैवें लाधला शिंपा स्वातीचा । त्यांचे हातीचें गेलें मोतीं ॥
काय कीजे अभक्ष्योत्पत्ति । व्हावें न स्वार्थी उदास ॥ ३० ॥

येथें शब्दमात्रा शब्दविता । नाहीं कोणी साई परता ॥
तोचि श्राव्य श्रवण श्रोता । ही एकात्मता न ढळावी ॥ ३१ ॥
ना तरी तें नाहीं वाचन । श्रवणीं सादर नाहीं कान ॥
जेथें न वृत्ती एकतान । पारखी कवण शब्दार्था ॥ ३२ ॥
श्रवणीं धरा निरभिमानता । श्रोते ही साईच भावावें चित्ता ॥
तरीच त्या श्रवणाची सार्थकता । अखंड अद्वैतता राखावी ॥ ३३ ॥
तेव्हांच सकल इंद्रिय प्रवृत्ती । साईरूप होतील निश्चिती ॥
जळीं जळतरंग स्थिती । ऐसिया वृत्ती समरसती ॥ ३४ ॥

तरीच ज्ञानियां परमार्थबोध । विनोदियांतें विनोदामोद ॥
कविताकोविदां पदप्रबंध । ग्रंथीं या आनंद सर्वत्रां ॥ ३५ ॥

असो पूर्वीं या सच्चरितीं । अध्याय एकोनचत्वारिंशतीं ॥
एका निजोत्तम भक्ताप्रती । समर्थ जो करिती उपदेश ॥ ३६ ॥

असतां तें भक्त बाबापाशीं । भगवद्गीता चतुर्थाध्यायासी ॥
आरंभापासून आवर्तनासीं । होते ते समयासीं करीत ॥ ३७ ॥

एकीकडे चरणसेवा । मुखें हळूच पाठ म्हणावा ।
म्हणतां संपतां तेहतिसावा । घेतला चौतिसावा म्हणावया ॥ ३८ ॥

निश्चळ मने लय लाउनी । म्हणत होते मनींचे मनीं ॥
परी नसतां कळेसें जनीं । असणार कोठुनी काय तरी ॥ ३९ ॥

म्हणू घेतां चौतिसावा । आलें साईनाथांचिया जीवा ॥
आतां येथें अनुग्रह करावा । सन्मार्ग दावावा भक्तोत्तमा ॥ ४० ॥

तया भक्ताचें नाम नाना । तंव बाबा म्हणती तयांना ॥
नाना कायरे पुटपुटसी मना । स्पष्ट रे कां ना वदसी मुखें ॥ ४१

केव्हांपासून मुखानें पाहे । कांहीं पुटपुट चालली आहे ॥
परी अवाज परिस्फुट नोहे । ऐसें हें गुह्य काय किरे ॥ ४२ ॥

मग नाना वदती स्पष्ट । करीत आहें गीतेचा पाठ ॥
इतरां न व्हावी माझी कटकट । आहे ही पुटपुट तदर्थ ॥ ४३ ॥

असो ती झाली लोकांची गोष्ट । परी मजसाठीं बोल पांस्पष्ट ॥
तुझा तुला तरी कळेका पाठ । पाहूं दे नीट वदले श्री ॥ ४४ ॥

मग 'तद्विद्धि प्रणिपातेन ' । उच्चस्वरें हा श्लोक म्हणून ॥
दाविला ना नाहीं प्रणिपात करून । ऐकतां समाधान बाबांस ॥ ४५ ॥

पुढें या श्लोकाचा अर्थ पुसतां । पूर्वाचार्य कथित अर्था ॥
यथा सांग नाना ही कथितां । बाबांनीं माथा डोलविला ॥ ४६ ॥

पुन्हां नानास करिती प्रश्न । 'उपदेक्ष्यंति ते ज्ञानं' ॥
नाना पाही हा त्रितीय चरण । करी पां मनन तयाचें ॥ ४७ ॥

त्यांतील 'तें'या अक्षरापाठीं । अकारार्थीं अवग्रहा पोटीं ॥
अज्ञानपदें अर्थ परिपाटी । हो ते का उफराटी पाही पां ॥ ४८ ॥

शंकरानंद ज्ञानेश्वर । आनंदगिरी आणि श्रीधर ॥
मधुसूदनादि भाष्यकार । करिती ज्ञान पर जो अर्थ ॥ ४९ ॥

तो मान्य आहे जैसा सकळिकां । तैसाच आहे मजही ठावका ॥
परी अवग्रहें होणारि या कौतुका । जाणूनिया व्यर्थ कां मुकावें ॥५०॥

ऐसें म्हणून साई कृपाघन । भक्त चकोर चातका कारण ॥
वर्षलेजे बोधामृतकण । झाले निरूपण पूर्वींच ॥ ५१ ॥

परी या साईलीलेचे वाचक । सर्वांसीच या अर्थाचें कौतुक ॥
वाटलें नाहीं कांहीं सार्थक । राहिले आश्चर्यकारक हें ॥ ५२ ॥

असो तयाचें समाधान । जेणें होईल सप्रमाण ॥
असा आणीक अल्प प्रयत्न । करितों अज्ञान समर्थना ॥ ५३ ॥

बाबांस कोठील संस्कृत ज्ञान । ऐसी ही शंका घेईल कोण ॥
संतां न अनधीत कांहींही जाण । शंकेचें कारण आणीकची ॥ ५४ ॥

अहो ' एकेन ज्ञातेन । सर्वंहि विज्ञातं भवति ' प्रमाण ॥
कोणा न मान्य हें श्रुतिवचन । तें अपरोक्षज्ञान साईस ॥ ५५ ॥

जैसा करतल स्थित आमलक । तैसें आमूलविश्व ज्यां देख ॥
तया संतां काय ना ठाऊक । सविताही प्रकाशक ज्यांचेनी ॥ ५६ ॥

जया तें हें एक ज्ञान । तयास कोठें उरलें अज्ञान ॥
तया विद्या जात अवगत जाण । महत्व कोण संस्कृता ॥ ५७ ॥

असो या लीलेचे कांहीं वाचक । म्हणती नाना अप्रामाणिक ॥
त्यांचा हा स्वकपोल कल्पित अप्रयोजक । अज्ञान व्यंजक अवग्रह॥५८॥

त्याणींच रचिलें हें थोतांड । अवग्रहान्वित अज्ञानकांड ॥
उगीच उठविला हा वादवितंड । निजज्ञान अखंड मिरवावया॥ ५९ ॥

नसताचि अवग्रह केला प्रस्थापित । ज्ञानाचे जागीं अज्ञान कांढित
ऐसा कांहीं तरी विपरीत । लावीत ते अर्थ गीतेचा॥ ६० ॥

परी पाहतां वस्तुस्थिती । विचार करितां सूक्ष्म चित्तीं ॥
साईलीला एकोनचत्वारिंशतीं । कांहीं न विसंगती कथेंत ॥ ६१ ॥

असोत कोणाच्या कांहींही कल्पना । प्रामाणिक व अप्रामाणिक नाना ॥
परी तयांनीं केलेलिया कथनां । वृथा चलानां न म्हणावें ॥

सोडूनियां नानांचा द्वेष । वाचकीं मव्हतां विकारवश॥
दूर सारितां दृष्टीचे दोष । दिसेल अशेष निर्दोष ॥ ६३ ॥

साईलीला उत्तमोत्तम । अध्याय एकोन चत्वारिंशत्तम ॥
वाचिल्यावीण या अध्यायीं निर्गम । होणार नाहीं सुगमपणें ॥ ६४ ॥

भगवद्गीता श्रीकृष्णमुखीं । चतुर्थाध्यायीं ज्ञान मखी ॥
चतुस्त्रिंशत्तम श्लोकीं । अज्ञानोन्मुखीप्रवचन ॥ ६५ ॥

'तद्विद्धिप्रणिपातेनपरिप्रश्नेनसेवया ॥
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं । ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ' ॥ ६६ ॥

हा तो गीतेचा मूळ श्लोक । यांतील त्रितीय चरणीं देख ॥
ज्ञानपदाआधीं अवग्रह एक । अज्ञान निदर्शक नियतसे ॥ ६७ ॥

नाणितां मना अवग्रह । ज्ञान हें पदचि निःसंदेह ॥
तद्विरुद्ध न कोणाही दुराग्रह । तो अर्थ संग्राह्य सर्वत्रां ॥ ६८ ॥

ज्ञानादेवतु कैवल्य । हें श्रुतिवचन सर्वत्रां मान्य ॥
तरी ज्ञानचि तत्वज्ञां उपदेश्य । बंधन हें अनावश्यकत्वां ॥ ६९ ॥

मी आत्मा साक्षी निर्मळ । शुद्ध बुद्ध मुक्त केवळ ॥
प्रत्यग्भूत चैतन्य सोज्वळ । अद्वयानंद अढळत्वें ॥ ७० ॥

परंतु मी नव्हे अज्ञान । अज्ञानाचें कार्यही मी न ॥
'अयमात्माब्रह्म' मी जाण । 'प्रज्ञानमानंद' निधान मी ॥ ७१ ॥

अहं ब्रह्मास्मि नित्यस्फुरण । शुद्ध विद्या ते हेंच जाण ॥
मी पापी अभागी दैवहीन । या वृत्तीची खाण अविद्या ॥ ७२ ॥

या मायेच्या पुरातन शक्ति । एकीचे पायीं बंधस्थिती ॥
दुजी पासावबंधनिर्मुक्ति । या जीवाप्रती अनादी ॥ ७३ ॥

नाम रूपाचा सकळ भ्रम । हा तो अवघा मायासंभ्रम ॥
अनिर्वचनीय माया परम । मोठी दुर्गम तरावया ॥ ७४ ॥

कल्पनेचें जें जें स्फुरण । तेंच मायेचें निवासस्थान ॥
बद्धमुक्तपस्थितीचें जनन । कल्पनेमधून निश्चित ॥ ७५ ॥

ज्ञानादेवतु कैवल्य । अबाधित हें श्रुतिप्रमेय ॥
परी न होतां पापकर्मक्षय । ज्ञानाचा उदय अशक्य ॥ ७६ ॥

जयां बाणले शुद्धज्ञान । संकल्पें त्यास त्यागिलें जाण ॥
तया नाहीं मायेचें बंधन । विकारास्थान तें नव्हे ॥ ७७ ॥

शुका सारिखा परमज्ञानी । विकल्पें झाली तयाही हानी ॥
अज्ञान प्रकटे विकल्पापासुनी । तें गुरुवांचूनी निरसना ॥ ७८ ॥

प्रवेशतां विकल्प ज्ञानीं । होय ज्ञानिया ही अभिमानी ॥
विटे कांजीच्या थेंबें दुधाणी । होतसे घाणी दुग्धाची ॥ ७९ ॥

म्हणोनि अज्ञान समजावें आधीं । तन्निरासे मनःशुद्धि ॥
होतांच प्रकटेल ज्ञान निरवधी । अभेद समाधि लाधेल ॥ ८० ॥

जया द्रव्य वैभव ध्यान । विषयसेवनीं अतृप्तमन ॥
स्त्रीपुत्रांचें अखंड चिंतन । तयाचें ज्ञान अज्ञानची ॥ ८१ ॥

ऐसा धन सुत दारा मोहित । ज्ञानी असतां नेणें निजहित ॥
म्हणोनि जोंवर भक्ति विरहित । अज्ञानावृत्त ज्ञान त्याचें ॥ ८२ ॥

जीव जात अज्ञानयुक्त । अज्ञानांतून होऊनि मुक्त ॥
ज्ञानी आणिक ज्ञानातीत । होणें तें निश्चित ब्रह्मरूप ॥ ८३ ॥

अज्ञान जातां प्रकटे ज्ञान । क्षमाशाली तो सज्ञान ॥
गेला न जोंवर देहाभिमान । तोंवर तो आधीन प्रकृतीचे ॥ ८४ ॥

रामकृष्णादि जे जे अवतार । संतसनकादि शिष्टप्रवर ॥
तयांच्या आज्ञेची प्रकृति किंकर । जियेनें तदितर भूलविले ॥ ८५ ॥

हृदयस्थ असतां सर्वांभूतीं । कोणी नेणें स्वरूपस्थिति ॥
ऐसीया मायेची अतर्क्यस्थिती । आवरणशक्ति अगाध ॥ ८६ ॥

तरी मी कर्ता मीचीं भोक्ता । सोडिल्यावीण खोटी अहंता ॥
तया हृदयस्था शरण न रिघतां । निजनिर्मुक्तता लाभेना ॥ ८७ ॥

नित्यानित्य वस्तु विवेचन । श्रवणमनन निदिध्यासन ॥
करा, व्हा, शमदमादि षट्कसंपन्न । तेणेंच निवर्तन अज्ञाना ॥ ८८ ॥

जग मजहून सारें भिन्न । मी तो परिमीत परिछिन्न ॥
देह तोचि मी हें भान । हे तों अज्ञान निर्भेळ ॥ ८९ ॥

ज्ञानप्रतिपादक वेदांतशास्त्र । तेथ अनुबंध चतुष्टय प्रकार ॥
परम कारुणिक भाष्यकार । वर्णिती विस्तारपूर्वक ॥ ९० ॥

अधिकारी विषय संबंध तीन । अनुबंध चौथा म्हणजे प्रयोजन ॥
प्रयोजनाचें होतां विवेचन । अज्ञाननिवर्तन तें कळतें ॥ ९१ ॥

जीवब्रह्माची जी ऐक्यता । तोच मुख्य विषय या वेदांता ॥
त्या ऐक्यप्रमेयांतर्गत जी अज्ञानता । तन्निवर्तता तें प्रयोजन ॥ ९२ ॥

त्या मूला ज्ञानाची निवृत्ति । तीच कीं स्वरूपानंदप्राप्ति ॥
म्हणोनि करुनि युक्तिप्रयुक्ति । अज्ञानोच्छित्ती आवश्यक ॥ ९३ ॥

जों न भेदाचें निरसन । त कोणीही सज्ञान ॥
देहाभिमानी याचें ज्ञान । पूर्ण अज्ञान त्या नांव ॥ ९४ ॥

स्वयें मिरवी सज्ञान । करी अविहित कर्माचरण ॥
जळो त्याचे जागेपण । तो कुंभकर्ण निद्रिस्त ॥९५ ॥

वेदबाह्य ज्याचें वर्तन । न करी वर्णाश्रमपरिपालन ॥
तयाच्या चित्तशुद्धीचे साधन । अविद्यानिरसन हें एक ॥ ९६ ॥

सत्वादि त्रिगुणत्रिप्रकारे । शब्दादि विषय नानाविकारें ॥
उपस्थ आणि जिव्हाद्वारें । ब्रह्मादि सारे ठकियेले ॥ ९७ ॥

जगज्जंगम प्राणिजात । अनादि अविद्या माया परिवृत ॥
रागद्वेषादि विकारें मोहित । अज्ञानावृत हे सर्व ॥ ९८ ॥

अविद्येमाजी जीवबद्ध । त्याचें प्रकटावया रूप शुद्ध ॥
अविद्या काम कर्मबंध । तुटला संबंध पाहिजे ॥ ९९ ॥

दुग्धें तुडुंब गळती सड । तेथेंच घट्ट चिकटलें गोचिड ॥
परी तया अशुद्धीं आवड । दुग्धाची काय चाड तया ॥१०० ॥

'पद्म दुर्दर आणि भ्रमर । कमळ सुंदर दोघांचें घर ॥
'परी परागीं भ्रमरा विहार । दुर्दुरा अहार चिखलाचा ॥ १०१ ॥

सन्मुख दिसे ज्ञानाचा गड्डा । अज्ञानाकडे मूर्खाचा ओढा ॥
अज्ञानचि वाटे ज्ञान मूढा । ज्ञानाचा पाढा काय तया ॥ १०२ ॥

होतां अविद्येचें निर्मूलन । स्वयें प्रकटे ब्रह्मज्ञान ॥
म्हणून अविद्येचें प्रतिपादन । आवश्यक जाण आरंभीं ॥ १०३ ॥

एका ब्रह्मज्ञानासमान । नाहीं पवित्र त्रिजगीं आन ॥
त्याच्याच उपदेशा अत्यंत मान । त्यावीण जीवन निर्फळ ॥ १०४ ॥

बुद्ध्यादिकांचा चेष्टा विषय । ब्रह्म हें असतें ऐसें कार्य ॥
तरी एकादें तरी इंद्रिय । तें हें होयसें दाखवितें ॥ १०५ ॥

ब्रह्मतत्त्व बुद्धिग्राही । 'बुद्धिग्राह्यमतींद्रिय' पाही ॥
ऐसे स्मृति गर्जतांही । श्रुतीस तें नाहीं संमत ॥ १०६ ॥

बुद्ध्यादिकांचा-झाल्या अभाव । ग्रहण कारणचि झालें वाव ॥
मग ब्रह्माचा अस्तित्वभाव । उरला न ठाव मानावया ॥ १०७ ॥

करणगोचर जें जें कांहीं । तें तें आहे इतर नाहीं ॥
हें तों सर्वत्र प्रसिद्ध पाहीं । ब्रह्म कदाही असतां नये ॥ १०८ ॥

ऐसा होईल याचा अर्थ । परी तेणें होईल अनर्थ ॥
सूक्ष्मतारतम्यपरंपरार्थ । बुद्धिही सत् निरंतर ॥ १०९ ॥

होईना का तिचाही प्रलय । तथेही ती वसे सत्प्रत्यय ॥
आत्मा विश्वाचें मूळ निःसंशय । अस्तित्वनिष्ठ लय सर्व ॥ ११० ॥

खडा मारितां घटावरती । आकारविलयें खापऱ्या उरती ॥
घटाकारा जरी निवृत्ति । खापऱ्या अनुवृत्तादर्शक ॥ १११ ॥

जरी घटकार्याचा ध्वंस । घटास्तित्वा नाहीं नाश ॥
खापऱ्या कारण अनुवृत्तीस । कार्यास्तित्वांश तेणेपरी ॥ ११२ ॥

शून्यत्वीं ज्याचें पर्यवसान । ऐसें न केव्हांही कार्यप्रविळापन ॥
अस्तित्वनिष्ठ लय हे प्रमाण । सत्प्रत्यलीन सद्बुद्धि॥ ११३ ॥
सर्व तीर्थें व्रतें पावन । पावनाहून पावन ज्ञान ॥
तया ब्रह्मज्ञानावाचून । भजनपूजन निरर्थक ॥ ११४ ॥
अविद्येनें चित्त मलिन । त्या चित्ताचें मळक्षाळन ॥
नाहीं ईशभक्तीवांचून । भक्तीविण ज्ञान उपजेना ॥ ११५ ॥
म्हणून आधीं अज्ञान जाण । तयाचा बोध तयाचें निरूपण ॥
होतां होईल तद्बंधनिरसन । भक्तीच प्रमाण तयातें ॥ ११६ ॥
पायायाचे डोळां अंजन । पडतां देखे भूमिगतधन ॥
तेवी भक्तीचें होतां अवलंबन । अज्ञाननिरसन ज्ञानोदय ॥ ११७ ॥
ज्ञान तेंच स्वरूपप्राप्ती । तया मूळ अज्ञाननिवृत्ति ॥
घडल्यावांचूनि ईशभक्ति । मायेची शक्ति अनिवार ॥ ११८ ॥
ज्ञानाअज्ञानाची भेंसळ । अज्ञान वेंचूनि काढावें निखळ ॥
खडे टाकून घ्यावे तांदुळ । आधणीं निवळ वैरावया ॥ ११९ ॥
भूतीं भगवंत ठायीं ठायीं । ज्ञानयज्ञादि उपासनाहीं ॥
विश्वतो मुख कृष्णा जो पाही । अज्ञानदाही ज्ञानास्त्र ॥ १२० ॥
आतां ज्ञानयज्ञाचे स्वरूप । "अहं ब्रह्मास्मि" जेथील यूप ॥
पंचमहाभूतें यज्ञमंडप । जीवेश्वर भेद पशु तेथें ॥ १२१ ॥
पंच इंद्रियें पंच प्राण । हेंच यज्ञाचे उपचारभरण ॥
मनबुद्धीचिया कुंडांमधून । प्रदीप्तीकरण ज्ञानाग्निचें ॥ १२२ ॥
यज्ञकर्ता जीव यजमान । करी अज्ञानघृतावदान ॥
आत्मानंदरसीं निमग्न । अवभृथस्नान जीवा घडे ॥ १२३ ॥

तात्पर्य अज्ञानघृतावाचून । कदा न प्रकटे ज्ञानहुताशन ॥
जीवेश्वर भेदातें जाळून । अभेदज्ञान प्रकट करी ॥ १२४ ॥

आदर्श स्वच्छ मलाच्छादित । वन्हि प्रकाश धूमावृत ॥
तैसें कामक्रोधाभिभूत ॥ अज्ञानें तिरोहित तें ज्ञान ॥ १२५ ॥

चंद्रबिंबा राहू ग्रासी । अथवा शैवालजैसें जळासीं ॥
तैसें स्वयंप्रकाश ज्ञानासी । आच्छादी कैसी ही माया ॥ ११६ ॥

मोठमोठ्या ज्ञात्यांची मती । भ्रष्ट होऊनि जाती अधोगती ॥
उपाय माहिती परीन तगती । आचरण करिती यथेच्छ ॥ १२७ ॥

डोळस असतां अंध होती । संग सोडूनि निःसंग वर्तती ॥
तेही बळें कुसंगें नाडती । आचरण करिती यथेच्छ ॥ १२८ ॥

वानप्रस्थ गृहस्थाश्रम घेती । करूं नये तें अचूक करिती ॥
जिया वस्तूची चिळस घेती । तीच स्वीकारिती प्रिय म्हणुनी ॥ १२९॥

प्रयत्नें जे पापे चुकविती । तेही अदृष्टें पापांत पडती ॥
काय म्हणावें ऐसिये स्थिती । ही काय ज्ञाती ज्ञान्याची ॥१३०॥

जरी मोठा ज्ञानी झाला । नेच्छी पापाचे सावलीला ॥
तरि तो कार्याकार्यज्ञतेला । भुले दीपाला पतंगसा ॥ १३१ ॥

पाप करणें हें अज्ञान । याची तया पूर्ण जाण ॥
परी हा काम प्रवृत्तिकारण । करी ना गुमान तयाची ॥ १३२ ॥

हें अवघें क्रियाजात । केवळ एका कामाचें चेष्टित ॥
काम सर्वानर्थाहेत । तोच की परिणत क्रोधरूपें ॥ १३३ ॥

कामगतीस जैं अवरोध । तैंच तो काम होई क्रोध ॥
पदोपदीं हा मोक्षास विरुद्ध । ज्ञानप्रतिबंधक ही वृत्ति ॥१३४॥

कामक्रोध यांचा त्रास । जडलाच आहे या जीवास ॥
ब्रह्मस्वरूपाजवळपास । ज्ञानाचे पंक्तीस वास यांचा ॥ १३५ ॥

पाण्यावांचून बुडवितात । अग्नीवांचून जाळितात ॥
शस्त्रावांचून मारतात । दोराविण करितात बंधन ॥ १३६ ॥

तयापुढे ज्ञानीही न टिकत । ज्ञानियां करिती पैजेने चित ॥
महाप्रलय करण्याचें सामर्थ्य । नकळतां ग्रासित प्राणिया ॥ १३७ ॥

चंदनाचे वृक्षामुळीं । जैसीं काळसर्पांचीं वेटोळीं ॥
तैसी कामक्रोधाची खोळी । वरून वेटाळी ज्ञानगर्भा ॥ १३८ ॥

इंद्रिये बुद्धि आणि मन । हीं त्या कामाचें आयतन ॥
तयांच्या योगें जीवाचें ज्ञान । झांकून मोहनें घाली तया ॥ १३९ ॥

जरी तुम्हां पाहिजे चंदन । तरी सर्पांचे करा कंदन ॥
कामक्रोधाचें सारूनि आवरण । साधावें निधान ज्ञानाचें ॥ १४० ॥

न करितां सर्पाचें कंदन । लाभेल काय कवणा चंदन ॥
कृष्णसर्प संहारिल्यावीण । पुरलेलें धन लाभेल का ॥ १४१ ॥

तैसें परतत्त्व आत्मज्ञान । तें पदरीं पडावया कारण ॥
प्रकृति जवनिका निस्सारण । हें एकचि साधन तदर्थ ॥ १४२ ॥

म्हणोन आधीं इंद्रियनियमन । तेणें कामक्रोधां निर्दळण ॥
जीवकामक्रोधाआधीन । अज्ञान आवरण ज्ञानास ॥ १४३ ॥

देहाहून इंद्रियें सूक्ष्म । मन तयांहून सूक्ष्मपरम ॥
बुद्धी मनाहूनही सूक्ष्मतम । परमात्मा बुद्धीहून सूक्ष्म ॥ १४४ ॥

सर्व संसारधर्म वर्जित । ऐसें हें परात्पर परमसत ॥
तो हा परमात्मा परमहित । तेंच अमृत निजरूप ॥ १४५ ॥

शुद्धबुद्ध नित्य मुक्त । तेंच तत्त्व अभेदस्थित ॥
तेंच परमानंदमूत । प्रत्यग्भूत चैतन्यातें ॥ १४६ ॥

जया नाम पंचीकरण । तेंच कीं मायारूपदर्शन ॥
अध्यारूपापवादैकसाधन । व्हावया प्रबोधन तयाचें ॥ १४७ ॥

अपंचीकृत पंचमहाभूतें । पंचतन्मात्रावदती ज्यांतें ॥
तत्कार्य प्राणेंद्रिय मनोबुद्धीतें । सूक्ष्म शरीरता येते आत्मयाची ॥ १४८ ॥

पहा पंचीकृत पंचभूतें । तेथून विराटे उदया येतें ॥
तया आत्म्याचें स्थूलदेहातें । विराट ज्ञाते वदतात ॥ १४९ ॥

स्थूल सूक्ष्म शरीरांकारण ॥ केवळ स्वस्वरूपाज्ञान ॥
तेंच साभास अव्याकृत जाण । शरीर कारण आत्म्याचें ॥ १५० ॥

हें कारण शरीर ख्यात । जें चैतन्यप्रतिबिंबयुत ॥
केवळा ज्ञाना कारणभूत । अव्याकृत अव्यक्त ज्या नाम ॥ १५१ ॥

आत्म्याचें अज्ञान तें या कारण । ना निरवयव ना सावयव ना उभय जाण ।
केवळ ब्रह्मात्मैकत्वज्ञान । तेणेंच कीं निरसन या देहा ॥ १५२ ॥

स्वस्वरूपीं अवस्थान । तयासिच मोक्ष अभिधान ॥
यावीण मोक्ष नाहीं आन । स्वरूपावस्थान तो मोक्ष ॥ १५३ ॥

केवल ब्रह्मात्मैकत्व ज्ञान । जाहल्या होईल अज्ञाननिरसन ॥
म्हणून अज्ञान समजावया जाण । तयाचें निरूपण आवश्यक ॥१५४॥

अविद्येनें शबल झालें । तेणें ब्रह्म शबलत्व आलें ॥
तया सत् हें नाम ठेविलें । ऐसें ते पावलें वाच्यत्व ॥ १५५ ॥

जरी अतीन्द्रिय मुळचें वहिलें । बुद्धिग्राह्य वाचेनें केलें ॥
तेव्हांच तें मनीं प्रविष्टलें । आकारा आलें ॐकारें ॥ १५६ ॥

याॐकारब्रह्माचें ध्यान । सर्वें करितां ईश्वरस्मरण ॥
होई जयाचें देहावसान । पावे तो जननसार्थक ॥ १५७ ॥

असो या वाच्य ब्रह्मापासाव । अव्यक्ताचा प्रादुर्भाव ॥
अव्यक्तापासूनि महत्तत्व । उपजे अहंभाव त्या पोटीं ॥१५८॥

पंचतन्मात्रा अहंकारीं । पंचमहाभूतें त्या माझारी ॥
पंचमहाभूतांचिया उदरीं । जग निर्धारीं जन्मलें ॥१५९॥

अविद्या माया रूपदर्शन । तेंच या जगाचें रूपलक्षण ॥
या अविद्येचें कराया निरसन। अज्ञानविवेचन आवश्यक ॥ १६०॥

अत्यंत विशुद्ध आणि निर्मळ । जें चिन्मात्र स्वरूप केवळ ॥
त्याहून वेगळें जें तें शबल । दोघांची भेसळ करितां नये ॥ १६१ ॥

लक्ष्य ब्रह्म जाणा निराळें । वाच्याहून तें अत्यंत निराळें ॥
म्हणून हीं अज्ञानाचीं पडळें । उपदेशबळें सारावीं ॥१६२॥

निद्रेमाजी पडतां स्वप्न । डोळे नसतां डोळस मन ॥
स्वयें देखे अखिल त्रिभुवन । अविद्याकारण या सर्वा ॥१६३ ॥

पाहूं जातां वस्तु एक । परी आभासेती आणिक ॥
रज्जु भासे सर्प देख । रजत शुक्तिके गर्भांत ॥ १६४ ॥

पहा सूर्याचे किरण केवळ । जन म्हणे तया मृगजळ ॥
परी हा केवळ मायेचा खेळ । ज्ञानी ही हतबळ इजपुढें ॥ १६५ ॥

पेटलेले कोलीत हातीं । जेव्हां कोणी गरगर फिरविती ॥
अग्निकंकण दृष्टोत्पत्ती । येतें ही ख्याती मायेची ॥ १६६ ॥

पाहूं जातां अग्नी खरा । अलातचक्रा नाहीं थारा ॥
तैसाच हा मायामोहपसारा । नसति या संसारा उत्पादी ॥ १६७ ॥

ऐसिया निर्धारें गेलिया भ्रम । संसार तेव्हांच पावे उपरम ॥
मी देह माझें कलत्रधाम । व्यर्थ परिश्रम हा सारा ॥१६८ ॥

पुत्रपश्वादि तृष्णापाश । इहीं वेष्टिले जाऊनि अशेष ॥
म्हणविती ज्ञानी पंडितेश । सुख न लवलेश गांठीस ॥ १६९ ॥

शास्त्रकुशल प्रज्ञावान । दुजा नाहीं आपणासमान ॥
अंतरीं मोठा हा अभिमान । असमाधानकारक ॥ १७० ॥

हेच माया वा अज्ञान । अथवा अविद्या प्रकृतिप्रधान ॥
आरंभीं ज्ञानी यांचेंच निरसन । करितां मग ज्ञान उपतिष्ठे ॥ १७१ ॥

ज्ञान हें तों स्वयंप्रकाश । करणे नलगे याचा उपदेश ॥
अज्ञानाचा होतां निरास । ज्ञानोल्लास प्रकटेल ॥ १७२ ॥

तेजःपुंज एकादें रत्न । जातां केरा मातींत दाटून ॥
गेलीं वर्षांचीं वर्षें लोटून । बुजालें स्फुरण तयांचें ॥ १७३ ॥

कर्मधर्मसंयोगप्राप्ति । कदा काळी लागतां हातीं ॥
वाटे हारपली समूळ दीप्ति । दगडमाती संगती ॥ १७४

पुढें तें स्वच्छ धासतां । वरील काट माती जातां ॥
पावे तें पूर्वील तेजःपुंजता । तैसीच अवस्था ज्ञानाची ॥ १७५ ॥

माती काटतें अज्ञान । याच अज्ञानें आवृत्त ज्ञान ॥
करितां काट मातीचें निरसन । उजळेल रत्न सहजेंच ॥ १७६ ॥

पापकर्म विनाशक । नित्यानित्य वस्तुविवेक ॥
तोचि सत्व शुद्धि प्रदायक । तोचि उत्पादक ज्ञानाचा ॥ १७७ ॥

हें जग मायेचा बाजार । खऱ्या नकली वस्तु अपार ॥
खऱ्या म्हणूनि नकली घेणार । ऐसेंच गिऱ्हाइक फार तेथें ॥ १७८ ॥

खरी निवडावी कैसी नकली । भल्याभल्यांची बुद्धी थकली ॥
ये लक्षणीं आणावी भुली । तीं तव समजलीं पाहिजेत ॥ १७९ ॥

म्हणोनि सवे लागे पारखी । नकली कां दिसे खऱ्या सारखी ॥
हे तो दावील देखोदेखी । जाईल शेखीं अज्ञान ॥ १८० ॥
अज्ञान जातां राहील ज्ञान । होईल सहजचि माया निरसन ॥
उरेल तीचि सद्वस्तु जाण । नलग प्रमाण प्रत्यक्षा ॥ १८१ ॥
सोज्वळ जरी बुद्धीचे डोळे । कल्पना तिमिरें असती झांकोळले ॥
हें तिमिर उपदेशें पळे । उरे जें सगळें ते ज्ञान ॥ १८२ ॥
वस्तुतः जरी मार्गीं माळ । दृष्टी देखतां सांज वेळ ॥
माळ असतां भासला व्याळ । अज्ञान पडळ कारण त्या ॥ १८३ ॥
खिशामाजील गुप्त दीप । उजळितां झाला अज्ञानलोप ॥
प्रकट झालें खरें स्वरूप । व्याळत्व आपाप मावळलें ॥ १८४ ॥
म्हणोनि अज्ञानाचा अपाय । घालवावया उपदेश उपाय ॥
तदर्थ ज्ञानी झिजवोनि काय । अज्ञान तें काय उपदेशिती ॥ १८५ ॥
असतां प्रपंचीं वर्तमान । प्रसंगें प्रारब्धें जें आपन्न ॥
तें भूतकार्य अज्ञानजन्य । आधीं हें ज्ञान आवश्यक ॥ १८६ ॥
'सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म' । अविद्या माया सकळ भ्रम ॥
या भ्रमा जें होईल उपरम । तेंच संभ्रम ज्ञानाचा ॥ १८७ ॥
ज्याचा गेला न देहाभिमान । तयासी कोण म्हणे सज्ञान ॥
अभिमानाचें अधिष्ठान । त्या नांव अज्ञान मूर्तिमंत ॥ १८८ ॥
जयास म्हणती मायेचा पूर । जयामाजी हें जगत चूर ॥
तो हा देखत भूळसंसार । अज्ञान मूळाधार तयास ॥ १८९ ॥
अज्ञानापासाव याचा उद्भव । अज्ञानजनित याचें वैभव ॥
एकत्वीं जो अनेकत्व भाव । तयाचा ठाव अज्ञान ॥ १९० ॥

किंचित प्रकाश किंचिदंधार। ऐसिया समयीं मार्गींचा दोर ॥
दोरचि असतां भासे विखार। भय अपार वाटतसे ॥ १९१ ॥
सर्पाभास केवळ अज्ञान। त्या अज्ञानें झांकिलें ज्ञान ॥
न होतां हे अज्ञाननिरसन। होईना मन निर्भय ॥ १९२ ॥
कोणास भासे सुमनमाळा। कोणास दिसे दंड डोळां ॥
एवंच हा भासचि सगळा। भ्रांतीच्या अवकळा अनिवार ॥ १९३ ॥
केवळ आगमवचनानुसारी। जो अस्तित्व श्रद्धानुकारी ॥
तोच ब्रह्मज्ञानाधिकारी। नास्तिक जन्मजन्मांतरीं नण तेच ॥ १९४ ॥
विश्व हे विपरीतदर्शीयां भ्रम। त्यांचा न फिटे जन्ममरण क्रम ॥
ब्रह्म तत्व तयां जें दुर्गम। तें अत्यंत सुगम अधिकारीयां ॥१९५॥
येथे न कामीं येई प्रवचन। अथवा अनेक वेदस्वीकरण ॥
अथवा न मेधा ग्रंथार्थधारण। ग्रंथावलोकन बहुश्रुतता ॥ १९६ ॥
शब्दें होईल शब्दज्ञान। तेणें कां होईल वस्तुविज्ञान ॥
बुद्धी अतिविवेक संपन्न। वस्तू न तदधीन केव्हांही ॥१९७॥
श्रुतीनीं मोठी बांधिली हाव। परी न लाधतां वस्तूचा ठाव ॥
परतल्या ऐसें वस्तूचें वैभव। खुंटली धांव जाणिवेची ॥१९८॥
षड्दर्शनें टेकीस आलीं। अद्यापि वादच करीत राहिलीं ॥
आत्मवस्तू ठायींच ठेली। शब्दा न आकळली केव्हांही ॥ १९९॥
झाले मोठे शब्दपंडित। वस्तुसूर्यापुढें खद्योत ॥
एकदां झालिया वस्तु प्राप्त। मावळे समस्त शब्दजाल ॥२००॥
जगीं पहा अंधारे रातीं। दीपप्रकाशें क्रिया चालती ।
परी सूर्योदय होतां प्रभातीं। जन उपेक्षिती दीपातें ॥२०१॥

तरी जें नव्हे वाचेचा विषय । होईल कैसें तरी उपदेश्य ॥
म्हणोनि अज्ञाननिरसन ध्येय । असावें आख्येय वक्त्यातें ॥२०२॥
एक अस्तित्व बुद्धया उपासन । तेणेंच आत्मा होऊन प्रसन्न ॥
करी निजतत्त्वभाव प्रकाशन । होई उपलभ्यमान उपासका ॥ २०३ ॥
आत्म्याचे ठायीं परमात्म ध्यान । दोहीं माजी अभेदानुसंधान ॥
येणेंपरी करितां उपासन । आत्माचि प्रसन्न उपासका ॥ २०४ ॥
तया नाहीं अन्य साधन । तेणेंच व्हावें लागे प्रसन्न ॥
साधक पाहून आत्मप्रवण । आत्मा त्या आपणची करी कृपा ॥२०५॥
होतां ग्रंथाची विषयसमाप्ति । वक्ते श्रोतयां सदैव प्रार्थिती ॥
श्रवणश्रमार्थ क्षमा मागती । हो शिष्टरीति सर्वत्र ॥ २०६ ॥
तैसें नव्हे या सच्चरितीं । कर्तृत्व याचें न माझे माथीं ॥
स्वयें साईच निज कथालिहिती । लेखणी मज हातीं देऊन ॥२०७॥
म्हणून नव्हे मी ग्रंथकर्ता । येथे न श्रांत कोणी-मजकरितां ॥
क्षमाकीजे श्रोतीं म्हणतां । आदळे माथा कर्तृत्व ॥ २०८ ॥
मज नाहीं येथें भूषण । किंवा नातळे अंगा दूषण ।
जेथें साईच कर्ता आपण । तयाचेनि संपूर्ण हा विषय ॥ २०९ ॥
घेऊनि साईचें अनुज्ञापन । केलें त्यांनीं जैसें कथन ॥
तैसें तैसें केलें मी लेखन । अज्ञाननिवेदन श्रवणार्थ ॥ २१० ॥
प्रकट कराया निजवैभव । अपुला प्रताप आपुला गौरव ॥
प्रवेशोनि मजमाजी स्वयमेव । विषयार्थ गुरुदेव प्रकाशी ॥ २११ ॥
देईल जो या ग्रंथा दूषण । अथवा त्याचें मानी जो भूषण ॥
ते दोघे मज वंद्य पूर्ण । निज नारायणस्वरूप ॥ २१२ ॥

भक्ताचिया परमहिता । स्वयें निर्मोनि निज चरिता ॥
हेमाडाचिया धरोनि हाता । कथा लिहिविता श्री साई ॥ २१३ ॥

ज्याचा शरीरपरिग्रह । केवळ करावया लोकानुग्रह ॥
खंडावया कुतर्क दुराग्रह । लोकसंग्रह रक्षावया ॥ २१४ ॥

म्हणोनि हेमाड तया चरणीं । अनन्यभावें येई लोटांगणीं ॥
पुढील रसाळ कथांच्या श्रवणीं । व्हावें श्रोतृगणीं सावचित्त ॥ २१५ ॥

स्वस्ति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । अज्ञाननिरसनं नाम
पंचाशत्तमोध्यायः संपूर्णः

श्री साई नाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

